महाराष्ट्र शासन

# उच्च व तंत्र शिक्षण विभाग

## तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र. १९६७, मुंबई-४००००१

दूरध्वनी क्र. ०२२-६८५९७४१९/४६४/४९३

ई-मेल - desk17@dtemaharashtra.gov.in वेबसाईट : https://dte.maharashtra.gov.in

क्रमांक : १७/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२३/२०५ दिनांक : ०३ ऑगस्ट, २०२३

# जाहिरात

**उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन २०२३-२४ करिता पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या वाढीव जागांसाठी विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.**

महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील ज्या गुणवंत विद्यार्थ्यांनी सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात पदव्युत्तर पदविका, पदव्युत्तर पदवी व पीएचडी अभ्यासक्रमासाठी, THE (Times Higher Education)/ किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आंत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थेमध्ये प्रवेश घेतला असेल , अशा विद्यार्थ्यांकरिता शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि. ०४.१०.२०१८, क्रमांक संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ व शासन शुद्धिपत्रक क्र. संकीर्ण-२०१९/प्र.क्र.२७४(भाग-२)/तांशि-४ दिनांक २२ मार्च, २०२२ व शासन पत्र क्रमांक पशियो-२०२३/प्र.क्र.५०/तांशि-४, दि. २९ मे, २०२३ नुसार सदर शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येत आहे.

आता शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक बैठक-२०२२/प्र.क्र.१८८/तांशि-४, दि. ३१ जुलै, २०२३ अन्वये या शिष्यवृत्तीच्या पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका जागांच्या संख्येत वाढ झालेली असल्यामुळे सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी Online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहेत.

या शिष्यवृत्तीसाठी खालीलप्रमाणे शाखा/अभ्यासक्रमनिहाय जागा उपलब्ध असतील :-

| अ. क्र. | शाखा/अभ्यासक्रम | पदव्युत्तर पदवी व पदव्युत्तर पदविका | डॉक्टरेट | एकूण |
|---|---|---|---|---|
| १. | कला | ०३ | ०१ | ०४ |
| २. | वाणिज्य | ०३ | ०१ | ०४ |
| ३. | विज्ञान | ०३ | ०१ | ०४ |
| ४. | व्यवस्थापन | ०३ | ०१ | ०४ |
| ५. | विधी अभ्यासक्रम | ०३ | ०१ | ०४ |
| ६. | अभियांत्रिकी/वास्तुकला शास्त्र | १२ | ०४ | १६ |
| ७. | औषधनिर्माणशास्त्र | ०३ | ०१ | ०४ |
| | **एकूण** | **३०** | **१०** | **४०** |

**सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत :**

* उमेदवार व उमेदवाराचे आई/वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
* शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये प्रवेश घेतलेल्या व प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे अद्ययावत (सन २०२३ मधील) THE (Times Higher Education)/ किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking २०० च्या आत असणे बंधनकारक आहे.
* उमेदवाराच्या पालकांचे/कुटुंबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरून सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (२०२२-२३ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु. ८ लाखापेक्षा जास्त नसावे.
* या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, निवड कार्यपद्धती, सुधारित वेळापत्रक इत्यादी माहितीकरिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://foreignscholarship2023.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळास भेट द्यावी.
* सदर संकेतस्थळावरील शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दिनांक ४ ऑक्टोबर २०१८ व शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४ दिनांक ०६ सप्टेंबर, २०२१ चा शासन निर्णय तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४ दिनांक ३० ऑक्टोबर, २०१८ व दिनांक ११ फेब्रुवारी, २०१९ ची शासन शुद्धिपत्रके पहावीत व त्याअनुषंगाने अर्जांची छाननी करण्यात येईल.
* सदर योजनेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी यापूर्वीच्या जाहिरातीन्वये अर्ज केलेल्या विद्यार्थ्यांनी पुन्हा अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

इच्छुक उमेदवारांनी https://foreignscholarship2023.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरावा व online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित विभागीय कार्यालयात खालील वेळापत्रकानुसार सादर करावीत.

| क्र. | कार्यक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | संकेतस्थळावर online पद्धतीने अर्ज भरणे व आवश्यक प्रमाणपत्रे व कागदपत्रे अर्जासोबत अपलोड करणे | १३ जुन, २०२३ ते १३ ऑगस्ट, २०२३ |
| २ | * ज्या उमेदवारांनी कला, वाणिज्य, विज्ञान व विधी शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, उच्च शिक्षण येथे<br>व<br>* ज्या उमेदवारांनी व्यवस्थापन, अभियांत्रिकी/वास्तुकलाशास्त्र व औषधनिर्माणशास्त्र शाखेंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमासाठी अर्ज केला आहे त्यांनी उमेदवार वास्तव्यास असलेल्या जिल्ह्याशी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालय, तंत्र शिक्षण येथे<br>वर नमूद केल्याप्रमाणे online भरलेल्या अर्जाची प्रत, मूळ प्रमाणपत्रे/कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी सादर करावीत. | १४ जुन, २०२३ ते १४ ऑगस्ट, २०२३ (सायंकाळी ५.०० वा.पर्यंत) |

विभागीय कार्यालये, उच्च शिक्षण व विभागीय कार्यालये, तंत्र शिक्षण यांची यादी वरील संकेतस्थळावरील माहिती पुस्तिकेमध्ये उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

Online अर्जाशिवाय इतर कोणत्याही पद्धतीने केलेला अर्ज विचारात घेण्यात येणार नाही. इच्छुक उमेदवारांनी निर्धारित कालावधीत वरीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे.

स्वा/-

(डॉ. विनोद मोहितकर)

संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय,

महाराष्ट्र राज्य, मुंबई

DGIPR-2023-24/2525